रेग्यु. दिवाणी मु.नं.१४२/२०
बाजीराव नलवडे वि.हरिभाउ पवार
CNR NO.MHST1400019042020

नि.२९,३१,३३ खालील संयुक्तीक आदेश

१. वादी यांनी प्रस्तुतचे अर्ज हे दाव्यातील प्रतिवादी क्र.४ अनिल हणमंत पवार हे मयत झालेमुळे त्यांच्याविरुध्द झालेला दावा अपशम तसेच मयताचे वारसांना अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ होवुन मिळणेसाठी व त्यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केले आहेत. प्रस्तुतचे अर्जासोबत वादीने शपथपत्र दाखल केले आहे.

२. वादी यांचे कथन की दावा प्रलंबीत असताना दाव्यातील मुळ प्रतिवादी क्र.४ अनिल हणमंत पवार हे दि.२३/०५/२०२१ रोजी मयत झाले. त्यांचे वारस मुदतीमध्ये अभिलेखावर घेणे कायदयाने आवश्यक व गरजेचे होते.वादींना प्रतिवादी क्र.४ यांचे वारसांना ज्ञान नव्हते. तसेच त्यांचे पत्ते,नावे याबाबत मुदतीमध्ये माहिती मिळू न शकल्याने मयताचे वारस अभिलखावर घेण्यासाठी विलंब झाला तसेच दाव्याचे कामकाज संबंधी वारस अभिलेखावर घेणेसाठी मुदतीमध्ये अर्ज दिला गेला नाही. त्यामुळे सदरचा विलंब माफ होवुन दाव्याचे कामकाज गुणदोषावर चालणे न्यायाचेदृष्टीने आवश्यक व गरजंचे आहे म्हणुन प्रतिवादी क्र.४ यांचे विरुध्द झालेला दावा अपशम चा आदेश रद्द होउन मिळणेसाठी व वारसांना अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन प्रतिवादी क्र.४ अनिल हणमंत पवार यांचे वारस १. गणेश अनिल पवार, श्रीमती छाया अनिल पवार, सौ. प्रियांका योगेश पांचागणे या वारसांना दाव्यामध्ये समाविष्ट करणे न्यायाचेदृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे म्हणुन प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचे अर्जाला आक्षेप घेतला असुन त्यांचे म्हणणे की दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असुन अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.तसेच मंजूर झाल्यास कॉस्ट देणेत यावी अशी विनंती केली आहे.

४. अर्ज वाचला, वादी प्रतिवादी चे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. मुळ वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा दावा निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता दावा हा चौकशीसाठी प्रलंबीत आहे. दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र.४ अनिल हणमंत पवार हे दि.२३/०५/२०२१ रोजी मयत झाले. वादीतर्फे मृत्यु दाखला अभिलेखावर घेणेत आलेला आहे. दाव्याचे कामकाज गुणागुणावर चालणेसाठी व भविष्यात तांत्रीक अडचण राहु नये म्हणुन अर्ज मंजुर करणे न्यायाचेदृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. प्रतिवादीचे वारसांनी अर्ज हा मुदतीत दाखल न केल्यामुळे दावा हा तात्रीक दृष्टया अपक्षम झाला आहे. प्रतिवादी यांना दाव्याच्या कामी नाहक त्रास झला म्हणून अर्ज हा काही कॉस्ट चे अटीवर मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज नि.२९,३१,३३ मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादी यांनी प्रतिवादी यांना कॉस्टची रक्कम रु. २००/- दिल्यानंतर प्रतिवादी क्र.४ यांचे वारसांना अभिलेखावर घेणेत यावे. बाबत

३. वादी यांनी अर्जाची सत्वर पुर्तता करावी.

फलटण. (पी. एच. पाटील)

ता.०४/०२/२०२३. ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर फलटण.